# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

## सोमवार, दिनांक ०१ एप्रिल, २०२४ / चैत्र १२, शके १९४५

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

२५. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ३८८ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी २८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती. एकूण प्रलंबित ३६० निवेदनांपैकी १६२ निवेदने मा. सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ रोजी वितरीत करण्यात आली. एकूण १९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १८ निवेदने सोमवार, दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६४ व्दारे मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. १८० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३५ निवेदने सोमवार, दिनांक १२ जून, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. १४५ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३३ निवेदने सोमवार, दिनांक ३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७४ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. एकूण ११२ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १४ निवेदने सोमवार, दिनांक १३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७९ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. एकूण ९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ४१ निवेदने सोमवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२२ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आाली. एकूण ५७ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ०७ निवेदने गुरुवार, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२५ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. एकूण ५० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १० निवेदने सोमवार, दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १३९ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली. आता एकूण ४० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ०७ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ०१ एप्रिल, २०२४**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

<u>याची प्रत</u> :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन शाखा

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १०९३**

"समाजात असलेले तृतीय पंथीय म्हणजे किन्नरांच्याही विविध मागण्या प्रलंबित असणे, किन्नर समाजाच्या संघटनांच्या प्रतिनिधींनी गेल्या अधिवेशनात त्यांच्या मागण्या सरकारकडे मांडलेल्या असणे, किन्नर लोकांना समाजात बहिष्कृत केले जाते किंवा वाईट वागणूक मिळत असणे, त्यांना रोजगारही मिळत नसल्याने ते भीक मागताना ट्रॅफिक सिग्नलवर किंवा इतर ठिकाणी दिसत असणे, महाराष्ट्र हा प्रगत राज्य तर आहेच पण देशाला दिशा दाखवणारे राज्य आहे त्यामुळे तृतीय पंथीयांना समाजात समानतेचा अधिकार देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी "किन्नर कल्याण महामंडळ" स्थापना करण्याची नितांत आवश्यकता, तसेच किन्नरांसाठी स्वतंत्र शौचालये नसल्याने त्यांची प्रचंड कुचंबना होणे, त्यामुळे अशी शौचालये तातडीने बांधणे अत्यावश्यक असणे, त्याचप्रमाणे सरकारी नोक-यांमध्ये आरक्षण, पोलीस स्टेशनमध्ये स्वतंत्र सेल, रेल्वेगाडीत महिलांसाठी असते तशी किन्नरांसाठीच स्वतंत्र बोगी, सरकारी अर्जामध्ये स्त्री, पुरुष याप्रमाणेच किन्नर असा तिसरा कॉलम यासह त्यांच्या रोजगार, घर, शिक्षण याबाबत अशा त्यांच्या विविध मागण्या असणे, तसेच काही दिवसांपूर्वी शासनाच्या पोलिस भरती प्रक्रियेमध्ये मा. उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून तृतीय पंथियांना सामावून घेण्यासंदर्भात आदेश दिलेले असणे, त्यामुळे तृतीय पंथियांना देखील समाजात मान-सन्मान मिळावा हे मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयावरून दिसून येणे, त्यासाठी शासनाने किन्नरांच्या कल्याणासाठी व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी, त्यांचे शिक्षण, रोजगार, घर आणि इतर कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी महामंडळाची स्थापना करणे गरजेचे असणे, समाज कल्याण खात्याच्या अंतर्गत किन्नरांच्या सर्व मागण्या, त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी कृती आराखडा बनविणे, त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे यासाठी तृतीय पंथियांना समानेतचा अधिकार देण्याकरिता शासनाने लवकरात लवकर निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**मा. मुख्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे निवेदन**

राज्यातील तृतीयपंथीय या समाज घटकांची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणण्यासाठी राज्य स्तरावर व विभागीय स्तरावर राज्यातील तृतीयपंथीय कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करणेबाबतचा शासन निर्णय दि.१३/१२/२०१८ निर्गमित करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयान्वये विहित केलेल्या मंडळाच्या संरचनेनुसार राज्यस्तरावरील तृतीयपंथीय हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळावर (राज्यस्तर) सदस्यांची दि. ८ जुन २०२० च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, सद्यस्थितीत सदर मंडळावर अशासकीय सदस्यांची नव्याने नियुक्ती करण्यासाठी शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

२. तसेच राज्यातील प्रत्येक जिल्हयांमध्ये तृतीयपंथीयांच्या समस्यांच्या/तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीची स्थापना दि. ७ ऑक्टोबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

३. त्याचप्रमाणे नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या खसरा क्र. ११९,१२० मौजा-चिखली (देव) येथील ४८३८.३१ चौ.मी. क्षेत्रावर अभिनव घरकुल योजनेंतर्गत ९ माळयांच्या ३ इमारतींचे बांधकाम नागपूर सुधार

प्रन्यासद्वारे करण्यात आले असून या इमारतीमध्ये एकूण २५२ सदनिका सवलत दरात तृतीयपंथीयांना देण्याचा मानस आहे.

तृतीयपंथीयांसाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी बीज भांडवल योजनाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

तृतीयपंथीय या समाज घटकांना जीवनमान चांगल्या प्रकारे घालविता यावे याकरीता तृतीयपंथीय या समाज घटकासाठी प्रत्येक विभागीय स्तरावर एक **आधार आश्रम** ही योजना सुरु करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

४. तृतीयपंथीयांना भेदभावरहित वागणूक देण्यासाठी तसेच तृतीयपंथींची लिंगनिहाय ओळख करुन तृतीयपंथीयांचा विकास आणण्यासाठी सर्व शासकीय विभाग आणि सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या आस्थापनेवरील सर्व पदांच्या भरती प्रक्रीयेमध्ये अर्ज/ आवेदनपत्रावर लिंग पर्याय म्हणून "पुरुष" व "स्त्री" या पर्यायासोबत "तृतीयपंथी" हा पर्याय उपलब्ध करुन देण्याचे अनिवार्य करण्यासाठीचा दि.३ मार्च, २०२३ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

५. राज्यातील तृतीयपंथीयांचे कल्याणासाठी व त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी तृतीयपंथीयांचे कल्याणमंडळ (२२३५ सी १९९) या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ या लेखाशिर्षाखाली रु. १५ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे.

६. राज्यातील तृतीयपंथीयासाठी सर्वकष धोरण आखणे यासह विविध धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी/नवीन योजना, नियम तयार करण्यासाठी शिफारशी करणे इ.साठी मा. सचिव (सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १४ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली आहे. सदर समितीच्या अद्यापर्यंत ३ बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

७. राज्यातील तृतीयपंथीयांना नवीन शिधापत्रिका मिळविण्यासाठी येणा-या अडचणींचा सहानुभूतीपूर्व विचार करुन त्यांना राष्ट्रीय सुरक्षा योजनेचा लाभ देण्यासाठी सुलभ कार्यपध्दती अनुसरुन पात्रतेनुसार योग्य ती शिधापत्रिका देणे व यासाठी सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांनी विशेष मोहिमेचे आयोजन करण्याबाबत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून दि.२७ सप्टेंबर, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

८. तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची (शौचालय) सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना याबाबत सूचना देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे रेल्वेगाडीत महिलांसाठी असते तशी तृतीयपंथीयाना स्वतंत्र बोगी उपलब्ध करुन देणे ही रेल्वे प्रशासनाच्या अखत्यारीतील बाब असल्याने या अनुषंगाने त्यांच्याकडे याबाबत पाठपुरावा करण्यात येईल.

९. तरी वरीलप्रमाणे तृतीयपंथीयांसाठी शिक्षण, रोजगार, घर व इतर कल्याणकारी योजना प्रस्तावित असून राज्यातील तृतीयपंथीय या समाज घटकाची सर्वांगीण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणण्यासाठी तसेच पुनर्वसनासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे.

---------------------*************---------------------

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
## श्री.पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. १५३९

"महाराष्ट्रात २०१३ मध्ये जादूटोणाविरोधी कायदा मंजूर होणे, कायद्याच्या जन जागृतीकरिता २०१४ साली प्रचार-प्रसार कार्यक्रम अंमजबजावणी समिती स्थापना करण्यात येणे, समितीमार्फत २०१४ साली सदर कामाचा आराखडा तयार करण्यात येणे, शासनाकडून योजना आराखड्यास निधी मंजूर होणे, सरकार बदलानंतर योजनेचे संपूर्ण काम ठप्प होणे, सदर समिती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत काम करणे तसेच सामाजिक न्यायमंत्री हे समितीचे पदसिध्द अध्यक्ष असणे, पंरतू महत्वाच्या योजनाकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, परिणामी राज्यात जादूटोणा,अंधश्रध्देच्या घटना होत असणे, शासनाकडून करावयाची उपाययोजना आणि कार्यवाही."

### मा. मुख्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे निवेदन

महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानूष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घोलण्याबाबत व त्यांचे समुळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम -२०१३, दिनांक २०/१२/२०१३ रोजी जारी केलेला आहे. सदर कायद्याची परिणामकारक व योग्य अंमलबजावणी करण्यासाठी मा. मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समितीची (Programme Implementation and Monitoring Committee) (PIMC)पुनर्रचना शासन निर्णय दिनांक ०२ मार्च, २०२२ अन्वये करण्यात आली आहे. सदर अधिनियमांच्या कलम ५(१) अन्वये अधिनियमातील कलम ५(२) मध्ये नमूद केलेली (अधिनियमातील तरतूदींचे उल्लंघन) कर्तव्ये पार पाडण्याकरीता पोलीस आयुक्तांच्या कार्यक्षेत्रात सहाय्यक आयुक्त (गुन्हे) यांची तसेच पोलीस अधिक्षकांच्या कार्यक्षेत्रात पोलीस निरीक्षक (स्थानिक गुन्हे शाखा) यांची **दक्षता अधिकारी** म्हणून नियुक्ती करण्याबाबतची दिनांक ०१ डिसेंबर,२०१४ रोजीची अधिसूचना गृह विभागाकडून निर्गमित करण्यात आली आहे. त्याप्रमाणे अंधश्रध्दा पसरविणाऱ्या जाहिरातीबाबत तक्रार दाखल करून घेणे व कार्यवाही करणे व यासाठी **एक विशेष कक्ष** निर्माण करण्याबाबत गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तात्काळ कार्यवाहीबाबत दिनांक २२ मार्च, २०२१ च्या पत्रान्वये गृह विभागाकडून सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच, शासन निर्णय दिनांक ०५ एप्रिल, २०२२ अन्वये, जादुटोणा विरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समितीच्या (Programme Implementation and Monitoring Committee) (PIMC) कार्यालयासाठी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,ठाणे** येथील पहिल्या मजल्यावरील ६५.०३ स्क्वेअर मीटर (७०० चौ.फूट) जागा वाटप करण्यात आली आहे.

तसेच, सह अध्यक्ष जादुटोणा विरोधी कायदा प्रचार प्रसार अंमलबजावणी समितीव्दारे, पुणे येथे दिनांक १८ व १९ जून,२०२२ व दिनांक १८ ते २२ जुलै,२०२२ रोजी अंधश्रध्दा निर्मुलनाबाबतच्या कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे चालू आर्थिक वर्षात अंधश्रध्दा निर्मुलनासाठी राज्यात जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे. जादुटोणा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी सन २०२३-२४ या चालू आर्थिक वर्षात लेखाशिर्ष २२३५ बी ३६१ अंतर्गत २६, जाहिरात व प्रसिध्दी करीता रू. ३० कोटी ५३ लक्ष इतकी निधी अर्थसकल्पीत करण्यात आला आहे.

ROTA-H-1553-1 (700-1-2024) ----------X----------

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

## महाराष्ट्र विधानसभा लक्षवेधी सूचना क्र.१६३८.

**श्री. संदीप क्षिरसागर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६३८ पुढीलप्रमाणे आहे :-**

" शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, भारत सरकारची मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती तसेच माध्यमिक शाळोतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृतत्ती व अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती दरवर्षी दिली जात असणे, असे असतानां बीड जिल्हा परिषदेचे समाजकल्याण अधिकारी यांनी या योजनांसाठी शासन निधी उपलब्ध असतांनाही समाज कल्याण अधिकारी (श्री. रविंद्र शिंदे ) यांनी जिल्हयात सन २०२१-२२ मध्ये विद्यार्थी संख्या किती आहे याची यादी शिक्षण विभागाकडून घेवून योजना राबविण्याची तसदी घेतली नसल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास येणे, यासंदर्भात छत्रपती संभाजीनगर येथील समाजकल्याण उपायुक्त कार्यालयामार्फत माहे, फेब्रुवारी, २०२३ रोजी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षा चा आढावा घेतल्यावर निदर्शनास आलेले असणे, सामाजिक न्याय विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांबाबत वारंवार सुचना देऊनही जिल्हयातील मुख्याध्यापक, शिक्षणाधिकारी व जिल्हापरिषदेचे समाज कल्याण अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे व त्यास प्रामुख्याने सर्वस्वी श्री.शिंदे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी हेच जबाबदार असल्याचे त्यामध्ये निदर्शनास आलेले असणे, त्यासंदर्भात समाजकल्याण विभागाच्या छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक उपायुक्त (जयश्री सोनकवडे) यांनी दि.१४ फेब्रुवारी, २०२३ रोजी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (श्री.पवार) यांना पाठविलेल्या पत्रामध्ये यासह अनेक आक्षेप नोंदवून ही बाब अनुसूचित जातीच्या मुलामुलींवर अन्याय करणारी असल्याचे नमूद केले असल्यचे निदर्शनास येणे, त्याबाबत विभागीय कारवाईचा प्रस्ताव पाठविण्याचे आदेशित करण्यात येणे, अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे बीड जिल्हयात या घटनेतील हजारो विद्यार्थी असतांना व शासन निधी उपलब्ध असतांना दरवर्षी हजारो विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहत असणे, हे लक्षात घेता शासनाने, याप्रकरणी सखोल चौकशी करण्याची तसेच याप्रकरणी जबाबदार असणारे जिल्हा समाज कल्याण अधिकारी ( श्री.रविंद्र शिंदे ) यांना निलंबित करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

### श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री, यांचे निवेदन

सामाजिक न्याय विभागाअंतर्गत विविध प्रि- मॅट्रीक व पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. त्यामध्ये जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयाच्या वतीने प्रादेशिक उपायुक्त व जिल्हा परिषद यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात ज्यान्वये अनुसूचित जातीच्या विद्यार्थी / विद्यार्थीनींना खालील नमुद विविध शिष्यवृत्ती योजनेचा लाभ ऑफलाईन पध्दतीने दिला जातो. त्याचबरोबर सदर योजनांना आवश्यक निधी राज्य लेखाशीर्षामार्फत तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून उपलब्ध करुन देण्यात येतो.

१) इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिक्षणाऱ्या अनु. जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती.

२) महर्षी रामजी शिंदे शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती.

३) माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या अनु. जातीच्या मुला-मुलींना शिष्यवृत्ती.

४) अस्वच्छ व्यवसाय काम करीत असलेल्या पालकांच्या पाल्यांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती

५) इयत्ता ९ वी व १० मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती.

दि. १४.२.२०२३ रोजी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर हयांनी दुरदृश्यप्रणालीद्वारे मॅट्रीकपूर्व विविध शिष्यवृत्ती योजनेचा आढावा घेतला. त्यादरम्यान सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील बीड जिल्हयातील शाळांमध्ये प्रवेशित एकूण विद्यार्थी आणि वरील शिष्यवृत्ती योजनेचा

लाभ घेणारे विद्यार्थी यांच्यात तफावत दिसून आली. तेव्हा विभागातील अनु. जातीचे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये म्हणून सन २०२१-२२ या वर्षातील अप्राप्त अर्ज मागवून घेणेबाबत प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर मार्फत संबंधीतांना आदेशित करुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक, गटशिक्षण अधिकारी (सर्व) मुख्याध्यापक (सर्व) यांना सन २०२१-२३ या वर्षातील प्रि-मॅट्रीक शिष्यवृत्तीचे प्रस्ताव जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे तात्काळ दाखल करणेबाबत आदेशित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या अहवालानुसार :-

१) सन २०२१-२२ या वर्षात अनुसूचित जातीच्या प्रत्येक शाळेतील प्रवेशानुसार शिष्यवृत्ती मिळालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

२) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड हे सन २०२१-२२ या वर्षातील उर्वरीत शिष्यवृत्तीचे अर्ज मागवून घेवून निकाली काढण्यात अकार्यक्षम ठरले आहेत. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे योजनानिहाय जिल्हयातील एकूण विद्यार्थी यांची आकडेवारी प्राप्त नाही.

३) अप्राप्त अर्जाबाबत प्रत्येक शाळेतील ज्या शाळांनी प्रस्ताव पाठविले नाहीत असे सर्व मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, गटशिक्षण अधिकारी यांनी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे सन २०२१-२२ मधील उर्वरीत अर्ज आज दिनांक १६.०३.२०२३ पर्यंतही जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे सादर केले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे अनु.जातीचे हजारो विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत ही वस्तुस्थिती आहे.

४) सदरील बाब ही अनुसूचित जातीच्या विद्यार्थी यांच्यावर अन्याय करणारी आहे आणि शिष्यवृत्ती वेळेत न मिळाल्याने मुलींचे बालविवाह होत असतात आणि शिक्षणाच्या गळतीचे प्रमाणही वाढत आहे.

५) प्राप्त निधी असतांनाही केवळ वरील सर्व अधिकारी, मुख्याध्यापक व कर्मचारी यांच्या अकार्यक्षमतेमुळे आजही निधी मुख्यलेखा व वित्त विभाग यांच्या खात्यावर काढून ठेवला आहे तो आजही अखर्चित आहे, ही वस्तुस्थिती आहे.

६) हजारो विद्यार्थी यांना निधी असतांनाही मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला नाही, ही बाब सत्य आहे.

प्रादेशिक उपायुक्त यांचा अहवाल विचारात घेता जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,बीड यांनी कार्यवाही न केल्याने त्यांना दिनांक १७/०३/२०२३ च्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. तसेच प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना सदर विषयाबाबत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परीषद, बीड यांचेवरील दोषारोप प्रपत्र आयुक्तालयास सादर करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार याबाबत प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेमार्फत प्राप्त होणारे दोषारोप व त्याअनुषंगाने जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचेकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

**************************************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक १११९**

**श्री. निलेश लंके,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"माहे जानेवारी २०२३ च्या शेवटच्या आठवडयात वा त्या सुमारास, मुंबई मनपाचे अनेक क्लास वन दर्जाचे अधिकारी शासकीय निवासस्थान मिळण्याकरिता वाट पाहात असताना, मुंबई मनपा प्रशासनातील शिपाई म्हणून नेमणूकीस असलेल्या व्यक्तीला गेल्या दोन-तीन वर्षापासून निवासस्थान म्हणून बंगला मिळाल्याची बाब उघडकीस येणे, नाना चौकातील डी विभागाच्या घनकचरा विभागात काम करणारे अर्जुन नराळे यांनी पत्नीच्या नावे कंपनी स्थापन करुन करोना काळात १ कोटी ११ लाख रुपयांची कामे तसेच मेंटनन्स विभागातील शिपाई रत्नेश भोसलेने पत्नी रियाच्या नावे आर.आर.एंटरप्रायजेस कंपनी स्थापन करुन ६५ लाख रुपयांची कामे मिळविल्याचे या प्रकरणी केलेल्या चौकशीत उघडकीस येणे, त्यामुळे या दोघांना सेवेतून निलंबित करणे, परंतु अद्यापही पालिकेने त्यांचेवर गुन्हा दाखल न करणे, नियमांचे पालन न करता या दोघांना मदत करणाऱ्या पालिकेच्या डी विभागातील दहा अभियंत्यांची खात्यांतर्गत चौकशी अजून सुरु न करणे, शिपायांना निलंबित करण्याचा झालेला निर्णय, परंतु सहकार्य करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची खात्यांतर्गत चौकशी सुरु न झाल्याने चर्तुथ श्रेणीत काम करणाऱ्या शिपाई तसेच अन्य कर्मचाऱ्यांच्या मनात प्रशासनाच्या भेदभाव प्रवृत्ती विरुध्द निर्माण झालेला तीव्र असंतोष, चीड व संताप, मिळविल्याची बाब उघडकीस येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "डी" विभागातील बी.आय.टी. चाळ येथील भाडे संकलक बंगला निवासस्थान म्हणून "डी" विभागातील अभियंत्यांना देण्याकरिता दिनांक २९.०३.२०१७ रोजी मंजुरी घेण्यात आली. परंतु कोणत्याही अभियंत्यांचा अर्ज प्राप्त न झाल्याने तसेच सदर निवासस्थानाचे क्षेत्रफळ साधारण २५० चौरस फुटापेक्षा कमी असल्याने सदर निवास्थान रिक्त होते. श्री. अर्जुन नरळे हे "डी" विभागातील मलनि:स्सारण विभागात दिनांक २२.०३.२०१६ ते १५.०७.२०२१ या कालावधीत मलनि:स्सारण सहाय्यक या पदावर कार्यरत होते. श्री. अर्जुन नरळे व श्री. नारायण शेळके यांच्या अनुक्रमे दिनांक २७.११.२०१८ व दिनांक २६.०९.२०१८ रोजीच्या मनपा निवासस्थान मिळणेबाबतच्या अर्जाच्या अनुषंगाने "डी" विभागाच्या अखत्यारीतील भाडे संकलकांकरिता असणारे निवासस्थान "विशेष बाब" म्हणून दिनांक ०५.१२.२०१८ रोजीच्या मंजुरीनुसार श्री. अर्जुन भिमराव नरळे व श्री. नारायण शेळके यांना निवासस्थान वितरित करण्यात आले. सदर सदनिका दिनांक ०१.०२.२०२२ रोजी श्री. अर्जुन भिमराव नरळे यांचेकडून रिक्त करुन घेऊन बृहन्मुंबई महानगरपालिकेने ताब्यात घेतली आहे. श्री. नारायण शेळके यांनी सदनिकेचा ताबा घेतला नव्हता.

कोविड-१९ साथीच्या काळात बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये विभाग पातळीवर कोविड-१९ च्या रुग्णांकरिता विविध ठिकाणी सीसीसी-१ व सीसीसी-२ उभारणे व सदर आरोग्य केंद्रात दाखल झालेल्या रुग्णांना जेवण, चहा, नास्ता, लॉंड्री, हाऊस किपिंग तसेच विविध औषधे व साहित्य पुरवठा करण्याकरिता ठेकेदाराकडून स्थळ दरपत्रिका मागवून सदर बाबी त्वरित केंद्रावर उपलब्ध करुण देणे गरजेचे होते. सबब बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या परिपत्रकांतील तरतुदीनुसार स्थळ दरपत्रिका मागविण्यात आल्या.

सदर स्थळ दरपत्रिकेच्या अनुषंगाने सद्य:स्थितीत निलंबित असलेले श्री. अर्जुन भिमराव नरळे व श्री. रत्नेश भोसले, शिपाई यांच्या पत्नी अनुक्रमे श्रीमती अपर्णा अर्जुन नरळे व श्रीमती रिया रत्नेश भोसले यांनी चालविलेल्या संस्था अनुक्रमे मे. श्री एंटरप्राईजेस व मे. आर. आर. एंटरप्राईजेस यांच्यामार्फत देकार प्राप्त झाले. सादर केलेल्या दरपत्रिकांनुसार मे. आर. आर. एंटरप्राईजेस व मे. श्री एंटरप्रायजेस हे लघुत्तम देकारदार असल्यामुळे त्यांना विविध कामे देण्यात आली.

बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या पत्नींनी चालविलेल्या खाजगी संस्थांना कोविड-१९ संबंधित विविध कामे दिल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट झाल्याप्रकरणी दिनांक ११.१०.२०२२ रोजी अन्य आदेशांसह संबंधित कर्मचाऱ्यांची खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश पारित करण्यात आले. त्यानुसार १ शिपाई, १ मल:निसारण सहाय्यक यांना खात्यांतर्गत सर्वंकष चौकशीसापेक्ष महानगरपालिका सेवेतून तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले असून, सदर निलंबित २ कर्मचाऱ्यांसह अन्य ३ कार्यकारी अभियंता, ३ सहाय्यक अभियंता, २ दुय्यम अभियंता, २ कनिष्ठ अभियंता अशा एकूण १२ अपचारी कर्मचाऱ्यांविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्याकरिता त्यांच्यावर ज्ञापन व दोषारोपपत्र बजाविण्यात आली आहेत. त्या अंतर्गत सदर अपचारी कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने खात्यांतर्गत सर्वंकष चौकशीची पुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

तसेच सदर प्रकरणी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांनी खालीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत:-

१. प्राथमिक चौकशी दरम्यान सादर न केलेल्या दोन निविदा नस्ती कार्यकारी अभियंता 'डी' विभाग यांचेकडून प्राप्त करुन सदर दोन निविदा कामकाजामध्ये काही अनियमितता झाल्या आहेत किंवा कसे याबाबत शहानिशा करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रमुख अधिकारी (चौकशी) खात्यामार्फत सक्षम प्राधिकाऱ्यांना सहाय्यक आयुक्त 'डी' विभाग यांनी सादर करावा.

२. मे. आर. आर. एन्टरप्राईज व मे. श्री एन्टरप्राईजेस या संस्थांनी 'डी' विभागामार्फत कोविड-१९ संबंधित विविध निविदा कामे करतांना आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचे सकृतदर्शनी आढळून येत असल्याने सदर दोन्ही संस्थांना काळ्या यादीत टाकण्याबाबत सहाय्यक आयुक्त 'डी' विभाग यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

३. मे. आर. आर. एन्टरप्राईज व मे. श्री एन्टरप्राईजेस या दोन्ही संस्थांच्या प्रोप्रायटर तसेच एच/पूर्व विभागातील शिपाई व सहाय्यक अभियंता (घ.क.व्य) 'डी' विभागातील तत्का. मल:निसारण सहाय्यक यांच्याविरुध्द एफ. आय. आर. दाखल करण्याबाबत सहाय्यक आयुक्त 'डी' विभाग यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

४. मलनिःसारण सहाय्यक या कामगार संवर्गात कार्यरत असताना देखील सहाय्यक अभियंता (घ.क.व्य) 'डी' विभाग यांच्या कार्यालयातील मल:निसारण सहाय्यक यांना रेंट कलेक्शन बंगला येथील सेवा निवासस्थान कसे पुरवण्यात आले याबाबत मालमत्ता विभागाकडून अहवाल प्राप्त करून सहाय्यक आयुक्त 'डी' विभाग यांच्या अभिप्रायासहीत उप आयुक्त (परि. १) यांना एक महिन्यात सादर करण्यात यावी.

**********

लक्षवेधी सूचना

गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पित) अधिवेशन

श्री.मंगेश चव्हाण, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.

" राज्यातील विविध गावांमध्ये ३५००० हून अधिक पोलीस पाटील कर्मचारी सामान्य नागरिक व पोलीस प्रशासन यामधील दुवा बनून कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचा प्रयत्न करीत असणे, अनेक ठिकाणी पोलीस पाटील यांनी आपल्या कर्तव्यदक्षतेमुळे अनेक गुन्हे व दंगली होण्यापासून वाचवल्याची झालेली उदाहरणे, पोलीस पाटलांच्या पुढाकारामुळे आज महाराष्ट्रात शेकडो गावे तंटामुक्त झालेली असणे, नवीन भरती होणाऱ्या पोलीस पाटील पदांसाठी महिलांची देखील निवड होत असल्यामुळे घरगुती कौटुंबिक वाद मिटविण्यासाठी त्यांचा मोठा वाटा असणे, कुठलाही वाढीव मोबदला न घेता कोविड काळात ग्रामपातळीवर पोलीस पाटील यांनी आपला पूर्णवेळ देत बजावलेले कर्तव्य यामुळे कोविड विरोधातील लढ्याला बळ मिळणे, कोविड काळातील पोलीस पाटील यांच्या कामगिरीचा अहवाल प्रशासनाकडून मागविल्यास या घटकाचे काम आपल्या लक्षात येईल की, कोविड मुळे अनेक पोलीस पाटील बांधवाना दुर्दैवाने आपला जीव देखील गमवावा लागल्याचे निदर्शनास येणे, सन २०१८ मध्ये शासनाने पोलीस पाटलांच्या मानधनात ३००० वरून ६५०० इतकी वाढ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेणे, तसेच मानधनात अजून वाढ करून इतर मागण्या देखील पूर्ण करण्याचे आश्वासनही देण्यात आलेली असणे, मात्र मध्यंतरीच्या काळात सरकारने पोलीस पाटील घटकाच्या सर्व प्रश्नांकडे साफ दुर्लक्ष केलेले असणे, यासंदर्भात गेल्या अनेक वर्षापासून अनेक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाला निवेदने देऊन, त्याचा पाठपुरावा करून, तसेच विधिमंडळ सभागृह त्यांचे प्रश्न उपस्थित करूनही आजतागायत राज्यातील पोलीस पाटील यांच्या समस्या शासनातर्फे सोडविण्यात आलेल्या नसणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी राज्यातील पोलीस पाटलांच्या मनात शासनाविरुद्ध होत असलेली नाराजी, याबाबत शासनाने पोलीस पाटील घटकांच्या समस्या सोडविण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यात पोलीस पाटील यांची सुमारे ३८६७२ पदे मंजूर असून सद्यस्थितीत २५३८० पोलीस पाटील कार्यरत आहेत.

राज्यातील पोलीस पाटील हे महसूल यंत्रणा व पोलीस प्रशासन यामधील महत्त्वाचा दुवा आहे. ही बाब विचारात घेऊन त्यांचे मानधन रु.३,०००/- वरून रु.६,५००/- इतकी वाढ करण्यास तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील अधिनियम १९६७ मध्ये दुरुस्ती / सुधारणा करण्यासाठी समिती स्थापन करण्यास गृह विभाग शासन निर्णय दि.०८.०३.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार

सेवाM/1275 (760-9-23)

महाराष्ट्र राज्य ग्राम पोलीस पाटील अधिनियम १९६७ मध्ये दुरुस्ती/सुधारणा करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे पोलीस पाटील यांना प्रवासभत्ता व दैनिकभत्ता वेळेवर अदा करण्याबाबत पोलीस महासंचालक, मुंबई यांच्या कार्यालयामार्फत घटक कार्यालयांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

पोलीस पाटलांनी केलेल्या विशेष उल्लेखनीय कार्याची दखल घेत शासनाने पोलीस पाटलांना विशेष उल्लेखनिय सेवा पुरस्कार व उल्लेखनिय शौर्य पुरस्कार प्रदान करण्याबाबतचा शासन निर्णय दि०१.१२.२०२२. रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार पुरस्कार ज्या वर्षासाठी असेल त्या वर्षाच्या पुढील वर्षी दि. १मे रोजी पुरस्कारार्थीस जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी हा पुरस्कार सदर जिल्हयाचे पालकमंत्री राज्यपालांच्या वतीने प्रदान करतात. तसेच शासन निर्णय दि.०८.०३.२०१९ अन्वये राज्यपाल पुरस्कारासाठी देण्यात येणारी पुरस्काराची रक्कम रुपये ५,०००/- वरुन रुपये २५,०००/- करण्यात आली आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय दि.२९.०५.२०२०, दि.१४.१०.२०२० व दि.१४.०५.२०२१ नुसार राज्यातील पोलीस पाटील यांना कोविड १९ संबंधित कामकाजाचे कर्तव्य बजावत असताना कोविडच्या संसर्गामुळे मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना रु.५०,००,०००/- इतके विमा कवच / सहायक अनुदान देण्यात येते. त्यानुसार मे, २०२३ पर्यंत ३१ पोलीस पाटील यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

महसूल व वन विभागाच्या दि ०२.०८.२०२२.च्या पत्रान्वये पोलीस पाटील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले असून त्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्रमांक-४९४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-४९४

सर्वश्री.शेखर निकम, दत्तात्रय भरणे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ४९४ पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील बेघर तसेच दयनिय स्थितीत घरात राहत असलेल्या कुटुंबासाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शासनाकडून घरकुल मंजूर करण्यात येत असणे, सदर योजनेत लाभार्थ्यांना घरकूल बांधण्यासाठी २ लाख ५० हजार इतके अनुदान शासनाकडून देण्यात येत असणे, त्यासाठी लाभार्थ्यांने रितसर अर्ज करुन त्यासोबत सात-बारा उतारा (सहा महिन्याच्या आतील) गटबुक नकाशा, खरेदीखत, मालकीपत्र भूमी अभिलेख मोजणी नकाशा, बिनशेती दाखला इत्यादी कागदपत्र जोडणे आवश्यक असणे, रत्नागिरी जिल्हयात सदर योजनेचे जवळपास ४५० ते ५०० लाभार्थी असणे, तथापि योजनेधिन कागपत्रांच्या जाचक अटींमुळे जिल्हयातील ग्रामीण भागात राहणाऱ्या एकाही लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता आला नसल्याचे दि. २ फेब्रुवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, सदर योजनेत लाभार्थ्यांच्या निवड केलेल्या अर्जाची पडताळणी केली जात असणे, तथापि अर्जाची छाननी/पडताळणी करण्यापूर्वी कोरोना साथीच्या आजारामुळे व शासनाकडून निधी न मिळाल्याने त्या काळात घरकुल योजनांच बारगळल्याचे तसेच लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करण्यापूर्वी शासनाच्या काही अटी व शर्ती लावण्यात आल्याने ही योजना रखडल्याचे निदर्शनास येणे, परिणामी जिल्हयातील लाभार्थ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, शासनाने त्याबाबत चौकशी करण्याची आवश्यकता तसेच कोरोना काळापूर्वीच्या व त्यानंतरच्या काळातील घरकुले मंजूर केलेल्या ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना अटी व शर्ती शिथिल करुन, निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्याची गरज व त्याबाबत शासनाची भूमिका."

---

मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे निवेदन

प्रधानमंत्री आवास योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असल्याने केंद्र शासनाच्या नियमावलीनुसार, राज्यातील ग्रामीण भागात ग्रामविकास विभाग आणि नागरी भागात गृहनिर्माण विभागाच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येते. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या तरतुदीनुसार केंद्र शासनाकडून रु.१.५ लक्ष व राज्य शासनाकडून रु.१.०० लक्ष असे एकूण रु.२.५० लक्ष अनुदान लाभार्थ्यास दिले जाते. तसेच, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत

सर्वसाधारण क्षेत्रात रु.१.२० लक्ष व डोंगराळ/नक्षलग्रस्त भागात रु.१.३० लक्ष इतके अनुदान लाभार्थ्याला दिले जाते.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत रत्नागिरी जिल्हयातील ०३ प्रकल्पांत एकूण ६४२ घरकुलांना केंद्रीय व संनियंत्रण समितीची मान्यता प्राप्त आहे. त्याचप्रमाणे घटक क्र.०४ BLC अंतर्गत एकूण ०९ प्रकल्पांत ७४ घरकुलांना मान्यता दिली असून, त्यापैकी ३७ घरकुलांचे काम पूर्ण झाले असून, २८ घरकुलांचे काम प्रगतीपथावर असल्याचे PMAY-MIS Portal वरुन दिसून येते.

-----------------------------------

# महाराष्ट्र विधानसभा

लक्षवेधी सूचना क्र. १२८२

सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

मा. श्रीमती जयश्री जाधव, विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १२८२ खालीलप्रमाणे आहे-

"कोल्हापूर शहरास ऐतिहासिक वारसा लाभला असून करवीर निवासिनी श्री अंबाबाई यांचे जागृत देवस्थान असून संपूर्ण राज्यासह जगभरातून भाविक, भक्त, पर्यटक कोल्हापूर येथील अंबाबाईच्या दर्शनाला येत असतात. तसेच करवीर निवासिनी श्री अंबाबाई आणि श्री क्षेत्र जोतिबा यासह ३०६७ देवस्थानाचे व्यवस्थापन पाहणाऱ्या पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीने भाविक- भक्तांच्या सोयी-सुविधांसाठी अनेक प्रकल्प हाती घेण्यात आलेले असणे, परंतु जागतिक कोरोना महामारी आणि इतर निधी न मिळाल्याच्या कारणामुळे बहुतांश प्रकल्प रखडलेले असणे, तसेच यातील काही बहुतांश प्रकल्प शासनाच्या निधीतून होत असून तसेच कोल्हापूर येथील पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या रखडलेल्या प्रकल्प यांना शासनाने निधी न दिल्यामुळे बरीचशी कामे अपूर्णावस्थेत असल्याने भविकांत प्रचंड नाराजी पसरलेली असणे, तसेच महत्वाच्या प्रकल्पापैकी शासनाने मान्य केलेल्या सुमारे २५ कोटी रूपयाच्या निधीतून श्री क्षेत्र जोतिबा देवस्थान विकास आराखडा प्रकल्प हा ही अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याने तो तातडीने मार्गी लागावा व दुसऱ्या टप्प्यातील कामाचे आराखडे तयार करण्यासाठी सदर समितीने पाठपुरावा करावा अशी मागणी असणे, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रलंबित प्रस्ताव यास तातडीने निधी देण्याचे मागणी केलेली असणे, परंतु शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी कोल्हापूर वासीयांचा शासनाच्या प्रति वाढलेली तीव्र संतापाची लाट, त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.""

---

## मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन

श्रीक्षेत्र महालक्ष्मी (करवीर निवासिनी, अंबाबाई) मंदिराच्या पुरातन ऐतिहासिक वास्तुचे जतन व संवर्धन करण्याकरीता प्रथम टप्यातील प्रस्तावित रक्कम रु.७९.९६ कोटीच्या कामांना नगर विकास विभागाने दि.२०/०२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या प्रशासकीय मान्यतेनुसार महानगरपालिकेस खालील रक्कम अदा केली आहेत.

| अ.क्र. | शासन निर्णयाचा दिनांक | वितरीत रक्कम |
|---|---|---|
| (१) | दि. ०८.०३.२०१९ | रु. ७.०० कोटी |
| (२) | दि. २०.०३.२०२० | रु. १.२० कोटी |
| (३) | दि. २९.०३.२०२३ | रु. २.५० कोटी |
| एकूण | - | रु. १०.७० कोटी |

श्रीक्षेत्र महालक्ष्मी मंदीर, कोल्हापूर तिर्थक्षेत्र विकास आराखडाअंतर्गत प्रथम टप्यातील प्रशासकीय मान्यता मिळालेली उर्वरित विकास कामे करण्याकरीता चालू आर्थिक वर्ष सन २०२३-२४ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये रु.४० कोटी निधीच्या पुरवणी मागणीचा प्रस्ताव मान्य झाला आहे.

श्री क्षेत्र जोतिबा देवस्थान ता. पन्हाळा जि. कोल्हापूर तीर्थक्षेत्रास सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात दि. ०१.०८.२०१७ च्या शासन निर्णयानुसार रू. २५.०० कोटी रकमेची प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर प्रशासकीय मान्यते बरोबर पहिल्या टप्प्यात रु.५.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला होता. प्रथम टप्प्यात वितरित केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र व उर्वरित निधी मागणी दि.०७.०९.२०२३ रोजी प्राप्त झाल्यामुळे सदर तीर्थक्षेत्रास दुसऱ्या टप्प्यात दि. १२.१२.२०२३ रोजीच्या शासन निर्याणानुसार रु. ५.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. अश्याप्रकारे एकूण रू. १०.०० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी,कोल्हापूर यांना वितरीत केला आहे. दुसऱ्या टप्प्यात वितरित केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर उर्वरित निधी वितरीत करणे शक्य आहे. प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांपैकी दर्शन मंडप बांधकाम व स्वच्छतागृह बांधकाम प्रगतीपथावर आहे तसेच सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पास तांत्रिक मान्यता प्राप्त झाली आहे, पाणीपुरवठा व भूमिगत विद्युत पुरवठ्याची कामे पूर्ण झालेली आहेत. अशा प्रकारे दोन्ही तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी प्रशासकीय मान्यतेनुसार मंजूर कामे प्रगतीत असल्याने शासनाचे दुर्लक्ष होत आहे, ही बाब खरी नाही.

*****************************